# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### रत्नागिरी जिल्हयातील साखरीआगर (ता. गुहागर) येथील ६ वर्षांपासून प्रलंबित जेटीचे काम सुरु करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१) ३५०४१ (०६-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये मंजूर झालेल्या तसेच मच्छिमारांची उपजिविका अवलंबून असलेल्या मच्छिमार जेटीचे काम मागील ७ वर्षांपासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जेटीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी दिनांक २४ जून २०१९ रोजी मत्स्यव्यवसाय विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य व दिनांक २६ ऑक्टोंबर, २०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत निधीची उपलब्धता असल्याने तात्काळ काम सुरु करण्याचे निदेश मा. मंत्री महोदय यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्देशास अनुसरुन पत्तन अभियंता रत्नागिरी यांनी सल्लागार यांची नेमणूक केली व पर्यावरण आघात अहवाल तयार करून महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरणाकडे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०२३) :**(१) , (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) तत्कालिन मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक ४/०४/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या आदेशान्वये रू.८.४३ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २०/०७/२०२२ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित राज्यस्तरीय योजनेतंर्गतच्या कामांना स्थगिती देण्यात आली होती. सदर स्थगिती दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उठवण्यात आली आहे. त्यामध्ये या कामाचा समावेश आहे. सद्य:स्थितीत उपरोक्त कामाची निविदा प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरूवात होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) येथील (एच.ए.एल.कंपनी) मिग विमान कारखान्याची यंत्रसामुग्री वाहतुकीसाठी आरक्षित केलेल्या जमिनीबाबत

**(२) ३५०४७ (०७-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) येथील (एच.ए.एल.कंपनी) मिग विमान कारखान्याची यंत्रसामुग्री वाहतुक करण्यासाठी सन १९६५-६६ मध्ये कसबे सुकेणे, ओणे, थेरगाव, जिव्हाळे, दिक्षी व ओझर मिग परिसरातील शेतकऱ्यांच्या आरक्षित केलेल्या जमिनी या मूळ मालकांना परत मिळण्याबाबतची मागणी स्थानिक शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमिनी या विनावापर पडून असल्याने त्या मूळ मालकास परत देण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच याबाबत धोरण निश्चित करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर जमिनी ह्या ओझर मिग HAL च्या रेल्वे सायडिंगकरिता भूसंपादन झालेल्या आहेत. म.प्रबंधक, HAL, ओझर मिग यांनी वारंवार पत्रव्यवहार करुन, आजरोजी मिग विमान कारखान्याची यंत्रसामुग्री वाहतूक करण्यासाठी संपादित केलेल्या जमिनींची आवश्यकता नसल्याने, सदरच्या जमिनी परत शासन जमा करण्याबाबत विनंती केली आहे. आज रोजी सदर जागेवर रेल्वेसाठी टाकलेले रेल्वे रुळ अस्तित्वात नाहीत. जागेचा वापर सध्या शेतकरी रस्ता म्हणून करत आहेत. तसेच रुळाच्या आजूबाजूची भूसंपादित झालेली काही जमीन शेतकऱ्यांनी शेतीसाठी व घरासाठी वहिवाटीत केलेली आहे.

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दि.१२.०३.२००४ मध्ये सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत केलेली जमीन, संपादन प्रयोजनासाठी वापरुन अतिरिक्त ठरलेल्या किंवा विनावापर असलेल्या जमीनी अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीच्या क्षमता प्राप्त झालेल्या जमीनीची विक्री केवळ जाहीर लिलावाद्वारे करुन अशा विक्रीतून प्राप्त होणारा निधी संविधानातील मार्गदर्शक तत्वानुसार अतियोग्य अशा सार्वजनिक प्रयोजनासाठी करण्यात यावा. परंतु ती मूळ धारकाला परत करु नये, तसेच या लिलावात मूळ भूधारकही भाग घेऊ शकतील असे नमूद केले आहे.

असा प्रस्ताव प्राप्त झाल्यास कार्यवाही करण्याची दक्षता घेत आहोत. तसेच सदर जमिनीची इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी कोणत्या यंत्रणेला आवश्यकता आहे किंवा कसे ? याबाबत या कार्यालयीन स्तरावर पडताळणी करण्यात येत आहे. सबब आज रोजी भूसंपादन झालेल्या जमिनी थेट पुन्हा मूळ मालाकास परत करण्याची तरतूद नाही
(३) अशी बाब नाही.

---

**हदगाव (जि.नांदेड) तालुक्यात बिबटयाच्या वावरामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण असल्याबाबत**

**(३) ४०६८८ (१८-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) व सांगली जिल्हयातील शिराळा व वाळवा तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबटयाच्या वावरामुळे शेतक-यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील तालुक्यातील बिबटयाला जेरबंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०२३) :**(१) हे खरे नाही.

बिबट्याच्या हल्ल्यात माहे जानेवारी, २०२२ मध्ये हदगांव तालुक्यात पशुधन हानीच्या १९ घटना तर सांगली जिल्ह्यातील शिराळा परिसरात पशुधन हानीच्या ९ घटना निदर्शनास आल्या आहेत.

तसेच दिनांक ०१.०२.२०२२ रोजी सांगली जिल्ह्यातील शिराळा परिसरात एक लहान मुलगा किरकोळ जखमी झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(२) आवश्यकतेनुसार वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (क) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या वन्यप्राण्यास जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १५१ (३)

## कटफळ (ता.सांगोला, जि. सोलापूर ) येथील वनपरिक्षेत्रात वन्यप्राणी व पक्षांसाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ४०७१० (१८-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कटफळ (ता.सांगोला, जि. सोलापूर) येथील वनपरिक्षेत्र कार्यक्षेत्रांत वन्यप्राणी व पक्षांसाठी असलेले पाणवठे वन संरक्षक अधिकारी / कर्मचा-यांच्या दुर्लक्षामुळे कोरडे पडल्याने पक्षी व प्राण्यांना अन्य पाण्याचा साठा उपलब्ध नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कटफळसह तालुक्यातील अन्य वन कार्यक्षेत्रांतील कृत्रिम पाणवठ्यात पाणी सोडून वन्यप्राणी व पक्ष्यांच्या पाण्याची सोय करावी, अशी मागणी वन्यप्रेमी व शेतकरी संघटनांची आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनपरिक्षेत्र कार्यक्षेत्रातील पाणीसाठा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) पुणे वनवृत्तातील सोलापूर वनविभागातील सांगोला तालुक्यातील कार्यक्षेत्रात असलेल्या ओढे, नाले या नैसर्गिक पाणवठ्यांमुळे वन्यप्राणी व पशुपक्षी यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय होते. तथापि उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी याकरीता सदर क्षेत्रात ८ कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये टँकरद्वारे पाणी उपलब्ध करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील गड -किल्ल्यांवरील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(५) ४२३०३ (२४-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे गतकालीन वैभव व वारसा जपणारे रायगड, कुलाबा, विशालगड आदी प्रमुख गड किल्ल्यांवर अतिक्रमण तसेच या माध्यमातून इस्लामिकरण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर किल्ल्यांवर होत असलेल्या अतिक्रमणाकडे पुरातत्व विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमण हटविणेबाबत लोकप्रतिनिधी, हिंदू जनजागृती समिती, दुर्गप्रेमी, विविध संघटनांनी व श्री.रघुजीराजे आंग्रे यांनी माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान भारतीय पुरातत्व विभागाकडे लेखी तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगडावर १०० हून अधिक लहान-मोठी आरसीसीची अनधिकृत बांधकामे झाली असल्याने या संदर्भात विशाळगड रक्षणआणि अतिक्रमणविरोधी कृती समितीने जिल्हाधिकारी व पालकमंत्री,कोल्हापूर यांना निवेदन दिले असून त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी आणि विशाळगड रक्षण आणि अतिक्रमणविरोधी कृती समिती यांची बैठक झाल्यावर त्यात कोणते निर्णय घेण्यात आले,

(५) असल्यास , राज्यातील सर्व गड-किल्ल्यांवर होत असलेल्या अतिक्रमणाची त्रयस्थ यंत्रणेमार्फत उच्चस्तरीय चौकशी करून यात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेसह गड-किल्ल्यांवरील अनाधिकृत बांधण्यात आलेल्या मजार, थडगे,दर्गे तसेच इतर अनाधिकृत अतिक्रमणे तात्काळ हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १५१ (४)

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
प्रश्नाधीन किल्ल्यापैकी रायगड व कुलाबा किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळाच्या अखत्यारीत असून विशाळगड किल्ला राज्य संरक्षित स्मारक आहे. या किल्ल्यावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
अशा स्वरूपाची निवेदने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडे प्राप्त झालेली आहेत.
(४) प्रस्तुत बैठकीत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी अतिक्रमण काढण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदर अतिक्रमणे निष्कासित करण्याच्या खर्चासाठी शासन निर्णय दिनांक ०३.०२.२०२३ नुसार रु.१,१७,०९,९९१/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेलमोहा (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथे सिंचन विहिरींचे लाभार्थी बदल्याबाबत**

**(६) ४२९६५ (१२-०४-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेलमोहा (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरीला मंजूरी देत असताना पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी आर्थिक व्यवहार करुन सिंचन विहिरीचे लाभार्थी बदलून निवड झालेल्या लाभार्थ्यांना डावलून इतर शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचा लाभ दिल्याची तक्रार पंचायत समितीच्या सदस्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०९-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रकरणी चौकशी करण्यात आली असून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) परभणी यांनी चौकशी केली असून सदर चौकशी मध्ये शेलमोहा, ता.गंगाखेड येथे सिंचन विहीरीचे लाभार्थी यांना मान्यता देणेबाबत गटविकास अधिकारी पं.स.गंगाखेड यांनी नियमानुसार मान्यता दिल्यामुळे सदर प्रकरणात कोणताही अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही.लाभार्थ्यांना डावलल्याची बाब नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वाघांच्या हल्ल्यात अनेक नागरिकांचा झालेला मृत्यु**

**(७) ४४८७० (२५-०९-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१९ ते सन २०२१ या कालावधीत वाघांच्या हल्ल्यात ५६ लोकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी व नागरीकांवर वाघांचे होत असलेले हल्ले रोखण्याबाबत शासनाने कोणती विशेष उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १५१ (५)

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०२३) :** (१) राज्यात सन २०१९ मध्ये २७, सन २०२० मध्ये ३४ व सन २०२१ मध्ये ५१ व्यक्तींचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.
(२) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- उन्हाळयात वन्यप्राण्यांना वनातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनतलाव, खोदतळे, कृत्रिम पाणवठ्यांची निर्मीती करण्यात येते व त्यामध्ये बारमाही पाणी उपलब्ध राहील याची काळजी घेण्यात येते.
- वनलगत असलेल्या गावांमध्ये मानव वन्यप्राणी संघर्षाच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांमुळे अतिप्रसंग उद्भवल्यास जलद बचाव पथकाच्या (Rapid Rescue Unit) सहाय्याने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे, पशुधनाचे नुकसान तसेच मन्युष्य जखमी किंवा मृत्युमुखी पडल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे
- वनालगतच्या ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असुन त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, र्निधुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सहकारी हौसिंग सोसायटी डीम्ड कन्व्हेयन्स करण्याबाबत.**

**(८) ४५०९२ (२१-०९-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी)** सन्मानीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(१) राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांपैकी कित्येक गृहनिर्माण संस्थांनी मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स्) प्रक्रिया पुर्ण केलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकार विभागामार्फत नव्याने नोंदणी होणा-या गृहनिर्माण संस्थांच्या जागा ४ महिन्यात डीम्ड कन्व्हेयन्स करण्याची प्रकिया पुर्ण करण्यासाठी योजना तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत जिल्हा उपनिबंधक (सहकार) यांनी या योजनेच्या अनुषंगाने किती गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण पुर्ण केले आहे,
(४) असल्यास, गृहनिर्माण संस्थांचे डीम्ड कन्हेयन्स त्वरीत करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०३-२०२३) :** (१) होय.
(२) (३) व (४) मोफा ॲक्ट, १९६३ च्या कलम १०, नियम ९ मध्ये विकासक/ प्रवर्तकांनी सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीनंतर चार महिन्याचे आत अभिहस्तांतरण करुन देण्याची तरतूद आहे, तसेच कलम ११ (३) मध्ये मानीव अभिहस्तांतरणाची तरतूद आहे. या तरतूदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार आयुक्त कार्यालयाने दि.४.४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना विशेष मोहिम राबवून मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या मोहिमेंतर्गत आतापर्यंत २३३४ संस्थांचे प्रस्ताव दाखल झाले आहेत. त्यापैकी ६२ संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण पुर्ण झाले आहे. जिल्हा उपनिबंधक, उपनिबंधक/ सहनिबंधक,

सहकारी संस्था यांचे कार्यालयांकडून मानीव अभिहस्तांतरणाचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात माहे जानेवारी ते मे या कालावधीत राज्याच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीर पर्ससीन नेट मासेमारी सुरु असल्याबाबत**

**(९) ४५६३३ (२५-१०-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ)** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात माहे जानेवारी ते मे या कालावधीत राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन नेट मासेमारीवर बंदी लागू असतांनाही दिवस-रात्र बेकायदेशीर पर्ससीन नेट मासेमारी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीरपणे एलईडी पर्ससीन नेटव्दारे मासेमारी करणाऱ्यावर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे पारंपारीक मच्छीमारी संकटात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी डॉ. गोपाळकृष्ण समितीची स्थापना करण्यात आली असून . सदर समितीने अहवाल सादर केल्यानंतर शासनाच्या मान्यतेने योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार समितीने अहवालात केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार व एलईडी पर्ससीन मासेमारी व हायस्पीड ट्रॉलर्सना आळा घालण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
( ५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०२३) :** (१) नाही.
(२) हे खरे नाही.
राज्याच्या जलधी क्षेत्रात गस्ती नौकेव्दारे प्रभावीपणे गस्त घालून अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर कठोरपणे कारवाई करण्यात येत आहे.
(३) हे खरे आहे.
डॉ.गोपाळकृष्णा यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नियुक्त करण्यात आलेला होता. तद्नंतर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ कायद्यातील तरतूदीनुसार डॉ.गोपाळकृष्णा समितीमार्फत प्राप्त अहवालातील तरतूदीनुसार शासन आदेश दि.१० ऑगस्ट, २०२२ अन्वये नव्याने पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले आहे.
(४) राज्याच्या जलधी क्षेत्रात गस्ती नौकेव्दारे प्रभावीपणे गस्त घालून अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर कठोरपणे कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्याबाबत**

**(१०) ४७०२८ (०९-१०-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोणत्याही क्षेत्रात निरपेक्षवृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस सन १९९७ पासून "महाराष्ट्र भूषण" हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२० या कालावधीमध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्कार घोषित होऊनही अद्याप प्रदान करण्यात आले नसून सन २०२१ या कालावधीपर्यंत पुरस्कार अद्यापही घोषित करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२० चे घोषित झालेले पुरस्कार प्रदान करण्याबाबत तसेच सन २०२१या कालावधीचे पुरस्कार घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०३-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. सन १९९५ पासून "मंहाराष्ट्र भूषण" हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार देण्यासाठी सल्लागार समिती गठीत करण्यात आली व १९९६ चा पहिला महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला.
(२) नाही. हे खरे नाही. २०१५ ते २०२० या वर्षात महाराष्ट्र भूषण पुरस्कार घोषित करण्यात आला नाही. सन २०२१ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिनांक १४ जून, २०२१ च्या शासन निर्णयान्वये श्रीमती आशा भोसले यांना घोषित केलेला आहे.
(३) महाराष्ट्र भूषण २०२१ चा पुरस्कार दिनांक १४ जून, २०२१ च्या शासन निर्णयान्वये श्रीमती आशा भोसले यांना घोषित करण्यात आलेला आहे. सदरील पुरस्कार हा पुरस्कारर्थीस सन्मानपूर्वक प्रदान करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई तालुक्यातील पाचुबंदर येथील धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे व मंजूर जेट्टीचे काम प्रलंबित असल्याबाबत.

**(११) ४७७०८ (२८-१०-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचूबंदर (ता.वसई ,जि.पालघर) येथील धुपप्रतिबंधक बंधारा व मंजूर जेट्टीचे काम आजतागायत प्रलंबित असल्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०, दिनांक १३ डिसेंबर, २०२० व दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत दोन्ही कामांची शासनाने पाहणी केली आहे काय, तसेच स्थानिक जनतेसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असणारा धुपप्रतिबंधक बंधारा व मंजूर जेट्टीचे प्रलंबित असलेली कामे किती कालावधीत पुर्णत्वास येतील व उक्त कामे प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०२३) :**(१) होय.
दिनांक ९/११/२०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) पाचूबंदर, ता.वसई, जि.पालघर येथील मासे उतरविण्याच्या ठिकाणी मच्छिमारांना मुलभूत सुविधा उतरविण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून पर्यावरण पूरक मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामास सुरूवात करण्यात आली आहे. परंतु कोरोना महामारीमुळे सदरहू काम पूर्ण करण्यास अधिक अवधी लागत आहे. सद्य:स्थितीत मच्छिमारांना मुलभूत सुविधा बोट यार्ड चे ७० टक्के, उतरता धक्का ९० टक्के, जोडरस्ता ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयात वन विभागाकडून वन्यप्राण्यांची गणना होत नसल्याबाबत

**(१२) ४८१३५ (३१-१०-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध जिल्हयात वन विभागाने दरवर्षी वैशाख पौणिमेला वन्यप्राण्यांची गणना केली परंतु उस्मानाबाद

जिल्हयात तुळजापूर, भूम, उमरगा, ही तीन वनपरिक्षेत्रे असतांनाही येथील वन विभागाकडून वन्यप्राण्यांची गणना झाली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयात तुळजापूर, भूम, उमरगा येथे वन्यप्राण्यांची गणना न करण्याची करणे काय आहेत
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०३-२०२३) :**(१), (२) व (३) राज्यात उन्हाळयामध्ये बौद्ध पोर्णिमा / वैशाख पौर्णिमेच्या दिवशी पाणस्थळांवर वन्यप्राण्यांची अंदाज गणना करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०२२ मध्ये निांक १६ व १७ मे, २०२२ रोजी उस्मानाबाद वन विभागातील तुळजापूर, भूम व उमरगा या तीन वनपरिक्षेत्रात पाणस्थळांवर वन्यप्राणी गणना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांच्या अभ्यासाकरता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेल्या अहवालाच्या कार्यवाहीबाबत**

**(१३) ४९६०७ (१७-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मध्ये अनुषंगिक सुधारणा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालातील कोणत्या शिफारशींच्या अनुषंगाने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मध्ये कोणत्या स्वरूपाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत,
(3) असल्यास, विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये अन्य कोणत्या शिफारशी केल्या आहेत,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०३-२०२३) :** (१), (२), (३) व (४) कोकणातील बेदखल कुळाच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरीता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालातील शिफारशी पुढीलप्रमाणे :-
१. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांच्या विविध कलमात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.
२. पीकपहाणीच्या नोंदी अद्ययावत ठेवणे.
३. कुळकायद्याच्या प्रकरणातील दावे चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
४. सर्व प्रलंबित दावे एक वर्षात निकाली काढण्यासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करणे.

या अहवालातील कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत आणि बेदखल कुळांच्या धोरणाबाबत अधिकार अभिलेखात (७/१२ सदरी) योग्य त्या नोंदी घेण्याच्या शिफारशीच्या अनुषंगाने कातकऱ्यांसह शेतमजूर आणि कारागिरांच्या घरठाणांबाबत अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासाठी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन नियम, १९५६ च्या नियम ११-अ अन्वये सुधारित तरतूद करण्यात आली आहे. तसेच या नियमांमुळे नोंदविलेले अभिलेखातील नोंदी संदर्भातील शेतमजूर आणि कारागिरांच्या गावातील वस्त्यांची ठिकाणे व घरे आणि घराखालील जमिनींच्या कब्ज्याबाबत दि.३१ मे २०२२ ही तारीख “कट ऑफ डेट”म्हणून शासन अधिसूचना दि.०१ एप्रिल २०२२ अन्वये निर्धारीत केली आहे. त्या तरतुदीमुळे कातकऱ्यांसह शेतमजूर आणि कारागिरांच्या घरठाणांचे अधिकार अभिलेख अद्ययावत होण्यास मदत होईल.

उपरोक्त नियमातील सुधारणेशिवाय अधिकारी, कर्मचारी यांना शासनाकडून शासकीय सेवेतील प्रशिक्षण धोरणांतर्गत वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, प्रलंबित दावे सक्षम प्राधिकारी यांनी एक वर्षात निकाली काढण्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये तरतूद केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील मच्छीमारांच्या जमिनी त्यांच्या मालकीच्या होण्यासाठी ड्रोन सर्व्हेद्वारे करण्यात आलेल्या भूमापनाबाबत**

**(१४) ४९६११ (१७-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील मच्छीमारांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी त्यांच्या गावठाण परिसीमेतील घरांचे महास्वामित्व अभियान अंतर्गत ड्रोन सर्व्हेद्वारे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान भूमापन करून त्यांना मिळकत पत्र (प्रॉपर्टी कार्ड) देण्यात येईल, असे महसूल मंत्री,महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ७ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ड्रोन सर्व्हेद्वारे करण्यात येणारे भूमापनाचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील किती मच्छीमारांना मिळकत पत्र देण्यात आली आहेत,
(४) अदयाप भूमापनाचे काम पूर्ण झाले नसल्यास त्याची कारणे काय आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मुंबई विभागात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे ड्रोनव्दारे सर्व गांवठाण भूमापनाचे काम करण्यात येत असून कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करीत मिळकत पत्रिका व सनद देण्याचे काम प्रगतीत आहे.

---

**धुळे जिल्ह्यासह राज्यात पशुसंवर्धन विभागात अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१५) ४९६३० (१७-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यासह राज्यात पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व कर्मचाऱ्यांची शेकडो पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील पशुधन पर्यवेक्षकांची पद १८ वर्षापासून रिक्त आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु असून शिफारस यादी प्राप्त झाल्यानेतर आवश्यक ती कार्यवाही करण्याचे संकल्पीत असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०३-२०२३) :** (१), (२) व (३) धुळे जिल्ह्यातील पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| पशुधन विकास अधिकारी | ५८ | ३२ | २६ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | १५ | ११ | ३ |
| पशुधन पर्यवेक्षक | ९७ | ९३ | ४ |
| एकूण | १७० | १३६ | ३३ |

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विभागातील गट-अ संवर्गातील पदे भरली जातात, या अनुषंगाने एकूण ३५४ पदे सरळसेवेने भरण्याबाबत चाळणी परीक्षा पार पडली असून, विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दि. १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे पशुसंवर्धन आयुक्तालयांतर्गत गट-क संवर्गाची ४२० पदे भरण्यास्तव IBPS कंपनीची निवड करण्यात आली असून, पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील बंद पडलेल्या आनंदवाडी बंदर प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत**

**(१६) ५०४०३ (२४-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील बंद पडलेल्या आनंदवाडी बंदर प्रकल्पाचे काम सुरु करण्यात यावे, १२० एचपीपेक्षा जास्त क्षमतेचे इंजिन असलेल्या नौकांचा शासनाच्या डिझेल कोट्यात समावेश करावा तसेच स्थगित ठेवलेला डिझेल कर परतावा मच्छीमारांना अदा करण्यात यावा इत्यादी मागण्या तारामुंबरी सहकारी मच्छीमार व्यवसायी संस्थेच्यावतीने उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मच्छीमारांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०२३) :** (१) होय.

दिनांक २४/०९/२०२२ रोजी पत्र प्राप्त झाले आहे.

(२) देवगड तालुक्यातील आनंदवाडी मत्स्यबंदर प्रकल्पाचे काम महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत सुरू करण्यात आलेले आहे.

शासन पत्र दि.१६/०२/२०२२ अन्वये १२० अश्वशक्ती इंजिनवरील मासेमारी नौकांना डिझेल कोटयातून वगळण्यात आले होते. तद्नंतर शासन शुध्दीपत्रक दि.१४/११/२०२२ अन्वये १२० अश्वशक्तीपेक्षा जास्त इंजिन क्षमता असलेल्या नौकांना डिझेल कोटा पुर्ववत करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सन २०२२-२३ मध्ये सिंधुदूर्ग जिल्हयाकरिता डिझेल तेलावरील प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत रू.९.९० कोटी इतका निधी वितरीत करणेत आला असून तारामुंबरी मच्छिमार संस्थेस रू.१.५३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) येथील वन जमिनीवरील अतिक्रमण वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत रहिवासी प्रयोजनाकरीता नियमित करण्याबाबत**

**(१७) ५०४४३ (१९-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) येथील वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबत वनसंवर्धन अधिनियम, १९८० अन्वये नगर पंचायत यांनी वन विभागास प्रस्ताव सादर केला व जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी विविध शिफारशीसह सदर प्रस्ताव वन विभागास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात वन विभागाने जिल्हाधिकारी यांचेकडून प्रस्ताव शासनास सादर केला आहे काय,
(३) तसेच शासनाकडून वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वन जमिन रहिवासी प्रयोजनाकरीता नियमित करण्याच्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०२३) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय, सडक अर्जुनी यांनी मौजे सडक अर्जुनी येथील वन जमिनीवर असलेले अतिक्रमण नियमितीकरण करण्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावात त्रुट्या असल्याने, सदर त्रुटींची पुर्तता करण्याबाबत उपवनसंरक्षक, गोंदिया यांनी मुख्याधिकारी, नगर पंचायत, सडक अर्जुनी, गोंदिया यांना दिनांक ३०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातारा जिल्ह्यातील जलयुक्त शिवाराच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) ५०५४६ (२९-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या सन २०१४ ते २०१७ या कालावधीत झालेल्या मृदसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याने चौकशी करण्यासंदर्भात शासनामार्फत केली जात होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराशी संबंधित श्री.शिसोदे यांचीच चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी जवळपास ७२ अधिकारी व कर्मचारी या गैरव्यवहारात सहभागी असून त्यांचेवर कोणतीही कारवाई होऊ नये म्हणून बरेच कर्मचारी निवृत्त झाले तरी चौकशी करण्यात आली नसून दक्षता पथकाने गैरव्यवहार दर्शविलेली रक्कम १८ कोटी ५२ लाखांवरुन चौकशी समितीने फक्त ५७ लाख ७२ हजार रुपये इतकी कमी रक्कम दाखविली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यातील मुख्य आरोपी व चौकशी समितीतील अधिकाऱ्यांचा नातेवाईक असल्याने पारदर्शक चौकशी केली नसून ७२ पैकी २२ कर्मचारी निवृत्त व निधन झाल्याने वगळण्यात येऊन उर्वरीत ५० जणांची चौकशीही संथगतीने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०२-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही. दक्षता पथकाने सादर केलेला अहवाल तार्किक / काल्पनिक अनुमानाच्या आधारावर असून त्यातील निष्कर्ष ठोस नसल्यामुळे श्री.एन.टी.शिसोदे, तत्कालीन संचालक (मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६.७.२०२१ च्या आदेशान्वये ५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली.
(३), (४) व (५) याप्रकरणातील एकूण ६ अधिकारी / कर्मचारी मयत झाले असून १७ अधिकारी /कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्याविरुध्द नियमानुसार विभागीय चौकशी सुरु करता आली नाही. दक्षता पथकाच्या चौकशी अहवालामध्ये एकूण वसूलपात्र / आक्षेपार्ह रक्कम रु.१८,५२,५८,५१०/- इतकी दर्शविली होती. मात्र, शिसोदे समितीच्या अंतिम अहवालामध्ये आक्षेपार्ह / वसूलपात्र रक्कम रु.५७,७८,०५८/- इतकी आढळून आली आहे. प्रस्तुत प्रकरणी एकूण २३४ अधिकारी / कर्मचारी जबाबदार असून जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सातारा यांच्या स्तरावरुन एकूण १७६ कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम-१० अन्वये विभागीय चौकशी करण्यात आली आहे. एकूण २३ अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाच्या दि.२१.१.२०२२ च्या ज्ञापनान्वये सामाईक

विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच ३५ अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम-१० अन्वये कृषि आयुक्तालयाच्या दि.३०.८.२०२२ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पु. ल. देशपांडे यांच्या जन्मदिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी शासन उदासिन असल्याबाबत

**(१९) ५०५९८ (२४-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाणारे पु. ल. देशपांडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने पुलोत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंगळवार दिनांक ८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पु.लं.चा जन्मदिन असताना सुध्दा पुलोत्सवासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील वर्षी कोरोना काळात पुलोत्सवाचे आयोजन करण्यात आले असताना सुध्दा हयावर्षी सार्वजनिक सण उत्सव उत्साहात साजरे करणात आले,तथापि सरकारच्या उदासीनतेमुळे आयोजन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे
(४) असल्यास, शासनाच्या उदासीनतेमुळे साहित्य प्रेमीमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे, याबाबत शासनाची भुमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
दिनांक १२ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत पु.ल. कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.
(४) पु.ल. कला महोत्सवात जास्तीत जास्त नवोदित कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नाराजीबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

## अकोला जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पासाठी बियाणे पुरवठा करताना प्रकल्पाच्या निधीतून बियाणे घेतल्याबाबत

**(२०) ५०६२० (१९-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पासाठी बियाणे पुरवठा करताना कपाशीच्या पेरण्या आटोपल्यानंतर या प्रकल्पाच्या निधीतून जबरदस्तीने शेतकऱ्यांसाठी बियाणे घेतल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने व कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०२-२०२३) :** (१) शेतकऱ्यांसाठी जबरदस्तीने बियाणे घेतले, अशी बाब नाही. स्मार्ट कॉटन मूल्यसाखळी विकास उपप्रकल्पातील प्रात्यक्षिकांकरिता कापूस बियाणे आवश्यक होते. तथापि, बियाणांचा पुरवठा विलंबाने झाला आहे.
(२) प्रकल्प संचालक आत्मा, अकोला यांना मे.वऱ्हाड ग्रेन्स ॲग्रीकल्चर प्रोड्युसर कं. लि., आगर यांच्याकडून बियाणे पुरवठा झालेला असून त्याची किंमत रु.१०,६९,२००/- इतकी आहे. याबाबतचे देयक अदा केलेले नाही. सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली असून, चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशी नुसार संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा खंडीत करण्यात आलेली आहे. तर तत्कालिन प्रकल्प संचालक, आत्मा, अकोला यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्याची, चौकशी समितीने शिफारस केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील साखर कारखान्यांना ऊस तोडणीसाठी अनुदानावर यंत्रे घेण्याकरिता साखर संचालनालयाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत

**(२१) ५०९१६ (१९-०१-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील साखर कारखान्यांना ऊस तोडणीसाठी मजुरांचा तीव्र तुटवडा जाणवत असल्याने ९०० ऊस तोडणी यंत्रे (हार्वेस्टर) घेण्याकरीता शासनाने अनुदान देण्याबाबत प्रस्ताव साखर संचालनालयाने शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार ऊस तोडणी यंत्रे घेण्यासाठी शासनाकडून अनुदान देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे तसेच सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०३-२०२३) :** (१) होय.
(२) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन-२०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी ऊस तोडणी यंत्रांना अनुदान प्रकल्पास केंद्र शासनाने दि.०८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विशेष बाब म्हणून रु.१९२.७८ कोटी निधीला मान्यता दिली असून सन-२०२२-२३ व सन २०२३-२४ या कालावधीसाठी ऊस तोडणी यंत्रधारकांना अनुदान देण्याबाबत प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंत्रालयातील विशेष निरिक्षण पथकाने बीड जिल्ह्यातील विविध महसूल कार्यालयातील कॅश बँक व बँकेतिल शिल्लक रक्कमेची केलेली तपासणी

**(२२) ५११९३ (२५-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील विविध महसूल कार्यालयातील कॅश बँक व बँकेतिल शिल्लक रक्कम यांची तपासणी मंत्रालयातील विशेष निरिक्षण पथकाने माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली असता सहा कोटी पंच्याऐंशी लाख सत्तेचाळीस हजार सहाशे एकोणसत्तर रूपयाची तफावत आढळून आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, त्यानुसार उक्त रक्कम वसूल करण्यासंदर्भात दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १५१ (१४)

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०३-२०२३) :** (१) होय.
(२) संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना रोख पुस्तकातील अखेरची शिल्लक व बँक खात्यातील अखेरची शिल्लक यामधील फरकाचा ताळमेळ घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या दिनांक २४.२.२०२३ च्या पत्रान्वये संबधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी ताळमेळ घेऊन अहवाल सादर केलेला आहे. तहसिलदार सर्वसाधारण कार्यालयाच्या ताळमेळात तफावत नसल्याबाबतचा अभिप्राय लेखाधिकारी, अंतर्गत लेखापरीक्षा पथक यांनी दिलेला आहे. उर्वरित आहरण व संवतिरण अधिकारी यांच्या तफावतीचा ताळमेळ घेण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाचे आदेश क्र. २०२२ / जि. बी. / डेस्क ५ / लेखा / कावि, दि. १७.११.२०२२ अन्वये अंतर्गत लेखा परीक्षण पथकास सदरील सर्व कार्यालयांचे सविस्तर तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या असून तद्नुषंगिक तपासणीची कार्यवाही सुरू आहे. अंतर्गत लेखा परिक्षण पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमोचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील भूमिअभिलेख विभागातील कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित असल्याबाबत

**(२३) ५१२८४ (२७-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूमिअभिलेख विभागाच्या पदोन्नतीसाठी माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेल्या अर्हता परिक्षेचा निकाल अदयाप जाहीर न झाल्याने या महिन्यात होणाऱ्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत निर्णय होणार नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे राज्यातील भूमिअभिलेख विभागातील सुमारे २०० कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने उक्त परिक्षेचा निकाल जाहीर करुन कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
भूमि अभिलेख विभागातील गट-क पदसमुह ३ संवर्गामधून गट-क पदसमुह २ संवर्गात पदोन्नतीकरीता आवश्यक असलेल्या भूमि अभिलेख अर्हता परीक्षेचे माहे मे, २०२२ मध्ये आयोजन करण्यात आलेले होते.
(२) हे खरे नाही.
(३) सदर परिक्षेचा निकाल दिनांक ०६/१०/२०२२ रोजी जाहीर करण्यात आला होता. तद्नंतर गुण पडताळणीस्तव प्राप्त अर्जांनुसार गुणांची फेरपडताळणी करुन दिनांक २७/१२/२०२२ रोजी सुधारीत निकाल जाहीर करण्यात आलेला आहे. त्यानंतर सर्व विभागीय उपसंचालक भूमि अभिलेख यांचेस्तरावर विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करुन गट-क पदसमुह ३ संवर्गातून गट-क पदसमुह २ संवर्गात पदोन्नतीसाठी उपलब्ध जागांवर दिनांक २५/०१/२०२३ रोजी पदोन्नती आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडेगाव व पसलू (जि.सांगली) या तालुक्यातील पशुवैद्यकीय रुग्णालयात सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) ५१५२६ (२७-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगाव व पसलू (जि.सांगली) या तालुक्यातील पशुवैद्यकीय रुग्णालयात सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांची

रिक्त पदे भरण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०३-२०२३) :** (१) व २) कडेगाव (जि. सांगली) या तालुक्यात श्रेणी १ व श्रेणी २ याप्रमाणे एकूण ९ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत, सदर दवाखान्यातील पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| पशुधन विकास अधिकारी | ८ | ७ | १ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | १ | १ | ० |
| पशुधन पर्यवेक्षक | १ | १ | ० |
| एकूण | १० | ९ | १ |

तसेच पलुस (जि. सांगली) या तालुक्यात श्रेणी १ व श्रेणी २ याप्रमाणे एकूण ४ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत, सदर दवाखान्यातील पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| पशुधन विकास अधिकारी | ३ | ३ | ० |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | १ | १ | ० |
| पशुधन पर्यवेक्षक | १ | १ | ० |
| एकूण | ५ | ५ | ० |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक शहरात इनामी जमीनी नोटरी करुन शासनाची फसवणुक केल्याबाबत

**(२५) ५१८०३ (२९-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक (जि.नाशिक) शहरातील दसक शिवारातील सर्व्हे क्रमांक ७८ व ७९ मध्ये इनामी जमिनी बेकायदेशीर नोटरी करुन शासनाची फसवणुक करुन गैरव्यवहार केल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास इनामी जमिनीची खरेदी विक्री करता येत नसून दसक शिवारातील क्रमांक ७८ व ७९ मध्ये केवळ नोटरी करुन सदर जमिनींची खरेदी विक्री होऊन या ठिकाणी पक्की बांधकामे देखील करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सर्व्हे नं. ७८ व ७९ या जमीनी इनाम वर्ग ६-ब च्या असून इनाम रद्द झाल्यानंतर सदर जमीनी वतनदारांना नवीन अविभाज्य शर्तीवर रिग्रॅट/पुर्नदान करण्यात आलेल्या आहेत. अधिकृत धारकांची नावे जमीनीच्या कब्जेदार सदरी दाखल आहेत.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

तहसिलदार, नाशिक यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून मौजे दसक येथील सर्व्हे. नं. ७८ च्या एकूण २० पोटहिस्स्यापैकी ११ पोटहिस्स्यांचे व सर्व्हे नं. ७९ चे एकूण १९ पैकी १४ पोटहिस्याचे सक्षम प्राधिकारी यांचे पूर्व परवानगीने
हस्तांतरण झालेले असून त्यापैकी ३ मिळकतींचा पूर्वपरवानगी अकृषीक प्रयोजनार्थ बिनशेती वापराकामी एकूण रक्कम रू. १६,७६,५००/- इतका नजराणा शासनजमा करण्यात आला आहे. सर्व्हे नं. ७८ व ७९ या जमीनीवर सुमारे १०० ते १२५ कुटुंब बांधकाम करून राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कुटुंबधारकांना सदरचे क्षेत्र कशा प्रकारे हस्तांतरण केले व कोणत्या अधिकाराने त्या ठिकाणी राहत आहेत याबाबत त्यांचेकडून खुलासे मागविण्यात आले आहेत. तसेच सदर सर्व्हे क्रमांकापैकी काही मिळकतींवर विविध स्वरूपाचे दिवाणी दावे दाखल असून ते न्यायप्रविष्ठ आहेत. सदर दाव्यांमध्ये अंतीम निकाल झालेला नसल्याने सदर जमीनीबाबत महाराष्ट्र जमीन महसल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार शर्तभंगबाबत कार्यवाहीसाठी जिल्हा सरकारी अभियोक्ता यांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाहीचे नियोजन आहे.

---

**राज्यभरात नोंदणीकृत हौसिंग सोसायट्यांच्या मानवी अभिहस्तांतरणाबाबत**

**(२६) ५१९०४ (२३-०१-२०२३). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुनर्विकास करुन नोंदणी केलेल्या सुमारे ६३ हजार सहकारी गृहनिर्माण संस्थांना विकासकांनी इमारतीच्या जागेचे गेले १५-२० वर्षापासून अभिहस्तांतरण (कन्व्हेएन्स) करुन दिले नसल्याचे तसेच विकासक त्या जागेवर ताबा दाखवून सदनिकाधारकांची फसवणूक करीत असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण पुनर्विकास केलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांची एकूण संख्या किती आहे व माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान किती सहकारी गृहनिर्माण संस्थेला शासनाने विकासकातर्फे अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण केली असून उर्वरित सहकारी गृहनिर्माण संस्थांची अभिहस्तांतरण कार्यवाही मुळ पातळीवर पूर्ण करण्याच्या दृष्टीने अद्याप कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) तसेच पालघर येथील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था या कार्यालयात मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेएन्स) करणेसाठी हौसिंग सोसायट्यांना वेठीस धरण्यात येत असून या कार्यालयात खाजगी दलालांचा सुळसुळाट असून कर्मचाऱ्यांच्या मर्जीतील एस.पी.कन्सलटंट या संस्थेमार्फत गैरप्रकार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतीत डीम्ड कन्व्हेएन्स हेल्प वेल्फेअर असोसिएशनने वेळोवेळी लेखी तक्रारी करुनही काहीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सहाय्यक निबंधक, उपनिबंधक कार्यालयात शेकडो तक्रारी व शेकडो अर्ज प्रलंबित असताना कर्तव्यात दिरंगाई करणाऱ्या व १८ महिन्यात गृहनिर्माण संस्थांचे डीम्ड कन्व्हेएन्स डीड करुन देण्याची जबाबदारी पार न पाडणाऱ्या राज्यातील किती जिल्हा उपनिबंधकांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, बिल्डराकडून जमीन व इमारतीचे कन्व्हेन्स डीड करुन देण्याबाबत तसेच सदनिका धारकांची फसवणूक होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०९-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. विकासकाच्या सहकार्याशिवाय मानिव अभिहस्तांतरण करण्याबाबत मोफा ॲक्ट १९६३ च्या कलम ११ मध्ये तरतूद आहे. याबाबत सविस्तर कार्यपद्धती शासननिर्णय
दिनांक २२/०६/२०१८ रोजी निर्गमित केला आहे. त्यानुसार गृहनिर्माण संस्था कार्यवाही करु शकतात.

(२) पुनर्विकास झालेल्या १३४१ नोंदणीकृत संस्थांचे मानिव अभिहस्तांतरणासाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ४०१ संस्थांचे मानिव अभिहस्तांतरण करण्यात आले आहे. सहकार आयुक्त यांनी दिनांक ०४/०४/२०२२ रोजीच्या

पत्रान्वये संस्था नोंदणीवेळी मानिव अभिहस्तांतरणाची कागदपत्रे जमा करुन घेण्याबाबत अधिनस्त कार्यालयाना सूचना दिल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) डीम्ड कन्व्हेएन्स हेल्प वेल्फेअर असोसिएशन यांनी केलेल्या तक्रारीवर विभागीय सहनिबंधक कोकण यांनी सुनावणी घेतली आहे.सदर प्रकरण निर्णयायासाठी बंद/ राखीव आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) सहकार आयुक्त यांनी दिनांक ०४/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्था नोंदणीवेळी मानीव अभिहस्तांतरणाची कागदपत्रे जमा करुन घेण्याबाबत अधिनस्त कार्यालयाना सूचना दिल्या आहेत.

---

**ग्रामिण भागातील शेतकऱ्यांच्या दुधाळ जनावरांसाठी गोठे बांधकामाबाबत….**

**(२७) ५२०५४ (२९-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामिण भागातील शेतकऱ्यांच्या दुधाळ जनावरांकरीता गोठा बांधकामासाठी योजना सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी या योजनेस पात्र आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील अनके पात्र लाभार्थी पंचायत समितीमधिल अधिकारी कर्मचारी यांच्या वेळकाढू व बेजबाबदारपणामुळे लाभार्थी या योजनेपासुन वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे

(३) हे खरे नाही.

आतापर्यंत बुलढाणा जिल्ह्यामध्ये ९१३ गोठ्यांची कामे सुरू करण्यात आली असून ७२३ गोठ्यांची कामे पूर्ण झालेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देसाईगंज, आरमोरी, कुरखेडा व कोरची (जि. गडचिरोली) येथील तालुका भुमि अभिलेख कार्यालयात मंजुर पदे भरण्याबाबत**

**(२८) ५२४३६ (२९-०१-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज, आरमोरी, कुरखेडा व कोरची (जि. गडचिरोली) येथील तालुका भुमि अभिलेख कार्यालयात मंजुर आकृतीबंधापैकी अनेक पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुका भुमि अभिलेख कार्यालयात रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०३-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे

देसाईगंज, आरमोरी, कुरखेडा व कोरची या तालुक्यांतील भूमि अभिलेख कार्यालयांतर्गत एकूण मंजूर ८४ पदांपैकी ४७ पदे कार्यरत असून ३७ पदे रिक्त आहेत. सदरची रिक्त पदे ही गट-क व गट-ड संवर्गातील आहेत.

(२) उपसंचालक भूमि अभिलेख, नागपुर यांचे अधीनस्त नागपूर विभागातील भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ संवर्गातील १८९ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर २०२२ रोजी IBPS कंपनीमार्फत ऑनलाईन परिक्षा घेण्यात आलेली आहे. त्यानुसार परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांची गुणांकनानुसार निकालाची यादी प्रसिद्ध करण्यात आली असून पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी/तपासणी करून नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरू आहे. गट-ड पदावरील भरतीस निर्बंध असल्याने ती पदे भरण्याची कार्यवाही सध्या सुरू नाही.

नागपुर विभागात सरळसेवा भरतीने नियुक्त झालेल्या उमेदवारांना, विभागातील सर्व कार्यालयातील कामे, प्रशासकीय आवश्यकता विचारात घेवून गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्याची तजवीज उपसंचालक भूमि अभिलेख, नागपुर प्रदेश, नागपुर यांचेकडून ठेवण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रोजगार हमी योजनेतील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ दिली जात नसल्याबाबत

**(२९) ५२४९१ (२७-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील २५ वर्षांपासून रोजगार हमी योजनेच्या विविध कार्यालयात कार्यरत १०७३ अस्थायी कर्मचाऱ्यांना दरवर्षी ११ महिन्यांची मुदतवाढ मिळत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२२-२३ या कालावधीत राज्यातील रोजगार हमी योजनेच्या कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांची मुदतवाढ न देता एकदा सहा महिन्यांची तर एकदा तीन महिन्यांची अशी माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर एकूण नऊ महिन्यांची मुदतवाढ देऊन नंतर मुदतवाढ न देता सदरील योजना शासन बंद करणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ न देण्याची कारणे काय आहेत तसेच शहरी भागासाठी रोजगार हमी योजना राबविण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोजगार हमी योजनेतील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासनाच्या नियमानुसार काही ठराविक कालांतराने रो.ह.यो. प्रभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील पदांचा आढावा घेण्यात आला व त्यास मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेवून सुधारित आकृतिबंधाचा शासन निर्णय दि.२८.१२.२०२२ नुसार निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरील योजना बंद करण्याची बाब शासन विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात काही जिल्ह्यात बनावट तणनाशक फवारणीमुळे द्राक्ष बागांचे नुकसान झाल्याबाबत

**(३०) ५२५४४ (२७-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर-माढा (जि.सोलापूर) येथे सर्वाधिक द्राक्ष पीके मोठ्या प्रमाणावर असून या परिसरात द्राक्षापासून बेदाण्याची निर्मिती केली जाते, हे खरे आहे काय,

(२) तसेच बार्डी-करकंब-जाधववाडी (ता.पंढरपूर) व घोटी-उपळाई (बु) (ता.माढा) येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी ऑक्टोबरच्या छाटणी अगोदर तण जाळण्यासाठी तणनाशक फवारुन द्राक्ष बागेची छाटणी केल्यानंतर एक महिना उलटूनही द्राक्ष बागा फुटत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कृषी विभाग तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी येथील शास्रज्ञ यांनी पाहणी करुन वस्तुस्थितीचा अहवाल शासनाकडे सादर केला असून बनावट औषध विक्री करणाऱ्या संबंधितांवर कृषी विभागाने कोणती कार्यवाही केली आहे काय,
(४) असल्यास, सदर बनावट तणनाशक फवारणीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची फसवणुक केलेल्या औषध निर्मिती कंपनीकडून आर्थिक मदत देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-०३-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) तणनाशके फवारणी केलेल्या २६ शेतकऱ्यांच्या बागेची तपासणी तालुकास्तरीय तक्रार निवारण समितिमार्फत दिनांक ०६.११.२०२२ व ११.११.२०२२ रोजी करण्यात आली. तसेच बार्डी, करकंब, जळोली, रोपळे ता. पंढरपुर येथील बागेची पुर्नपाहणी तालुकास्तरीय समितीकडुन दिनांक ०९.१२.२०२२ रोजी करण्यात आली. सदर पाहणीचा अहवाल संबंधीत शेतकरी यांना दिलेला आहे. शेतकऱ्यांनी फवारणी केलेले Glystop ४१% SL (Glyphosate ४१% SL) हे तणनाशक M/s Modern Agrigenetics Ltd. Indore, Madhya Pradesh - ४५२००१ यांचे उत्पादन असून लॉट नं. MAL/GLY ४१/०८P आहे. सदर तणनाशकाची राज्यामध्ये विनापवानगी विक्री केल्यामुळे सदर कंपनीविरुध्द किटकनाशक अधिनियम १९६८ चे कलम १३ सह किटकनाशक नियम १९७१ चे नियम १० चे उल्लंघन केले. असल्याने कंपनी व विक्रेता ओंकार कृषि केंद्र, करकंब, ता. पंढरपूर यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, करकंब येथे गुन्हा रजिस्टर नं. ०३९८/२०२२ दिनांक १८.११.२०२२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच ओंकार कृषि केंद्र, करकंब ता. पंढरपूर यांचा परवाना क्रमांक LAID११०८०९६९ दिनांक ०९.११.२०२२ पासून पुढील आदेश होईपर्यंत निलंबित केलेला आहे.
(४) किटकनाशक अधिनियम १९६८ व किटकनाशक यो नियम १९७१ मधील तरतुदीनुसार किटकनाशक निर्मिती कंपनीकडुन आर्थिक मदत देणेबाबत तरतुद नाही. कृषि विभागाकडुन शेतकऱ्यांना तक्रार निवारण समितीच्या अहवालाची प्रत देऊन मा. ग्राहक मंच, सोलापूर येथे दावा दाखल करणेसाठी मार्गदर्शन करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### श्री.संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग भूसंपादनाच्या नुकसान भरपाईबाबत.

**(३१) ५२५४६ (२९-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील महाळुग, बोरगांव, माळखांबी व बोंडले या गावामधून श्री.संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम सुरु असून या गावातुन राष्ट्रीय महामार्ग क्रं.९६५ ग हा गेलेला असून सदर रस्त्यासाठी जमिनींचे भूसंपादन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांची फळ झाडे, बांधकाम,बोअरवेल यांच्या रस्त्याच्या भूसंपादनात समावेश झाल्याने शेतकऱ्यांना भूसंपादन नुकसान भरपाईचा अद्यापपर्यंत मोबदला मिळालेला नाही. जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग, अकलुज यांच्याकडे तक्रार देऊनही त्याच्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय. त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय.
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग, माळशिरस यांनी पारित करण्यात आलेल्या निवाडयात उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडील प्राप्त संयुक्त मोजणी विवरणपत्र (परिशिष्ट -१६) मध्ये समाविष्ट असलेली फळझाडे, बांधकाम व बोअरवेल इत्यादी बाबींची नुकसान भरपाई संबंधीत पात्र लाभार्थ्यांस वितरीत करणेची कार्यवाही सुरु असून कोणत्याही लाभार्थ्यास नुकसान भरपाई पासून नाहकपणे वंचित ठेवलेले नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय, सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांचेकडे प्राप्त झालेल्या फळझाडे, बांधकाम व बोअरवेल इत्यादी मोबदल्या बाबत प्राप्त झालेल्या तक्रारी / हरकतींची सत्यता पडताळून निर्णय घेण्यात आलेला असून मोबदला वाटप करण्यात आलेला आहे.

सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी (CALA), उपविभागीय अधिकारी,माळशिरस ,अकलूज यांचेकडून मोबदल्याची रक्कम राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील तरतुदीनुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना महाळुंग, माळखांबी, बोरगाव व बोंडले ता. माळशिरस येथील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनामधील फळझाडे, बांधकाम बोअरवेल इत्यादी बाबतची नुकसान भरपाई अदा केलेली आहे.

---

### अंबाजोगाई (जि.बीड) यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी अधिनियमाच्या कामाची चौकशी करण्याबाबत

**(३२) ५२७१९ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील तहसीलदार श्री.राहुल पाटील हे कार्यरत असताना मोठ्या प्रमाणावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेच्या कामात अनियमितता करण्यात आल्याने कामे न करता बोगस बिले तयार करून शासनाच्या रक्कमेचा अपहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी पत्र. क्र.२०२२/रोहयो/जन-२/सीआर/कवि- दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या पत्रान्वये अनियमितते प्रकरणी तत्का. तहसीलदार, श्री.राहुल पाटील व इतर पाच अधिकारी कर्मचारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून त्रुटींच्या पूर्ततेसह प्रस्ताव दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०९-०३-२०२३) :** (१)हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार अनियमिततेबाबत जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिखली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील मुंगसाजी महाराज सुतगिरणी अध्यक्ष यांच्याकडून सुत गिरणीवर कोट्यवधी रुपये वसूल करण्याबाबत

**(३३) ५२८६० (२४-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील मुंगसाजी महाराज सहकारी सुतगिरणी मर्यादित ही सुत गिरणी शेतकरी शेअर्स व शासनाचा भाग भांडवलावर उभी राहिलेली सुत गिरणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुत गिरणीच्या उत्पन्नातून शासनाकडून घेतलेले भाग भांडवल परत करणे अपेक्षित असताना सुत गिरणीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी शासनाचे घेतलेले भाग भांडवल परत केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुत गिरणी अध्यक्ष यांनी शासनाचे घेतलेले भाग भांडवल परत केले नाही म्हणून वस्त्रोद्योग संचालक आणि आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी या संस्थेवर तब्बल ५३ कोटी ८५ लाख ५२ हजार ७१२ रुपयांचा कर्ज चढविल्याची घटना दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कर्ज सुत गिरणीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या चुकीने चढविलेला असल्याने त्यांच्याकडून वसुल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) होय, हे ही खरे आहे. सदर सूतगिरणीकडे दिनांक ३१.३.२०२२ अखेर थकीत रक्कम रुपये ५३,८५,५२,७१२/- वर दिनांक ०१.०८.२०२२ रोजी सूतगिरणीच्या ७/१२ वर शासनाचा बोजा चढविण्यात आला आहे.
(४) वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर कार्यालयाकडून या सूतगिरणीला थकीत रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, नियमितपणे पत्राद्वारे थकीत रक्कम भरणा करण्याचे सूचित करण्यात येत आहे. संचालक मंडळ सभेत थकीत शासकीय रक्कम भरण्याच्या विषयाबाबत सूतगिरणीच्या संचालकांना अवगत करुन तातडीने थकीत रक्कम भरण्याचे निर्देश वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर कार्यालयाने दिलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील संस्थांमध्ये संचालक मंडळात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीला स्वतंत्र एक जागा राखीव ठेवण्याबाबत

**(३४) ५२९७५ (२४-०१-२०२३). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्व जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील संस्थांमध्ये संचालक मंडळात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीला स्वतंत्र एक जागा राखीव ठेवण्याची मागणी आदिवासी संघटनानी केली असून त्याप्रमाणे सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत सचिव, सहकार विभाग यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात भारतीय संविधानाच्या कलम ३१४ व ३४२ नूसार अनुक्रमे अनुसूचित जातीला व अनुसूचित जमातीला स्वतंत्र अधिकार असतानाही सहकार क्षेत्रातील संचालक मंडळात स्वतंत्र जागा राखीव नसल्याने अनुसूचित जमातीच्या संघटनांनी व नागरीकांनी शासनाकडे अनेकदा निवेदने दिली व आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०३-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अनुसूचित जातीसाठी एक व अनुसूचित जमातीसाठी एक अशी स्वतंत्र राखीव जागा ठेवण्याबाबत शासनाकडे निवेदने दिली आहेत.
(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ब मधील तरतूदीनुसार सहकारी संस्थांमध्ये अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती यासाठी एक राखीव जागा आहे. सहकार कायदा व नियमात सुधारणा करण्यासाठी शासनाने गठित केलेल्या समितीने राज्यातील विशिष्ट जिल्ह्यांमध्ये असलेली अनुसूचित जमातीच्या लोकांची संख्या तसेच, बहुसंख्य सहकारी संस्थांमधील अनुसूचित जमातीचे सदस्यत्व याबाबत साधक बाधक विचार करून अनुसूचित जमातीसाठी एक स्वतंत्र जागा ठेवणे उचित होणार नसल्याचा निर्णय घेतला असल्याने, अधिनियमात दुरूस्ती करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोमेवाड उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विवादग्रस्त राजुरा उपविभागातील जमिन वन विभागाला हस्तांतरण झाल्याबाबत

**(३५) ५३०११ (२९-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोमेवाड प्रकरणात उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विवादग्रस्त राजुरा उपविभागातील जमिन वन विभागाला हस्तांतरण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायरान जमीनीबाबत रिट याचिका रा.मा.क् ३६६९/२४०९ नुसार विविदग्रस्त घोषित केलेल्या जमिनीवरील तहसीलदार कोरपना रा.मा.क् २१-२२-३७ सन २०१३-१४-१८-१८ मध्ये वा त्यादरम्यान मौजा पिपर्डा, ता.कोरपना येथील विविदग्रस्त जमिनीचे पट्टे महसूल विभागाने देऊन गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गायरान जमिनीबद्दल शासन परीपत्रकाव्दारे अतिक्रमण निष्कासीत करण्याचे निर्देश असतांना महसूल अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही बेकायदेशीर असल्याने उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०३-२०२३) :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ याचिका क्र.३६६९/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.१०.२०१० रोजी महसूल व वन विभागाच्या सक्षम प्राधिका-यानी उपलब्ध अभिलेखा आधारे महसूल व वन क्षेत्र वेगवेगळे दर्शविणारे नकाशे तयार करावे आणि यासाठी आवश्यक तेव्हा सुदुर संवेदन तंत्रज्ञानाची मदत घ्यावी या दिलेल्या निर्देशानुसार, महाराष्ट्र सुदुर संवेदन उपाययोजन केंद्र, नागपूर (MRSAC) यांच्या मार्फत चंद्रपूर जिल्हयातील महसूल, वन व खाजगी जमिनींची माहिती तयार करण्यात आली. परंतु काही जमिनीवर महसूल व वन या दोन्ही विभागानी हक्क सांगितल्याने ते क्षेत्र विवादीत क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले. महसूल व वन विभागाच्या दिनांक ०९.०६.२०१५ च्या पत्रानुसार वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंमलात येण्यापूर्वी वाणिज्य, शेती, निवासी व सार्वजनिक वापर अशा वनेत्तर वापरात असलेले, परंतु "राखीव वन" म्हणून घोषित केलेले ३३४८६.०० हेक्टर इतके विवादीत क्षेत्र "वनक्षेत्र" म्हणून समजण्यात यावे, असे निर्देश दिलेले आहेत. विवादीत क्षेत्रापैकी जिवती तालुक्यातील वनखंडात समाविष्ट नसलेले ५६५९.८५४ हे.आर. क्षेत्र व निर्वाणीकरण झालेले २९८९.९५५ हे.आर.असे एकूण ८६४९.८०९ हे.आर.क्षेत्र विवादीत क्षेत्रातुन वगळण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य वन संरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांच्याकडे सादर केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी हजारो शेतकरी अनुदान सुविधेपासून वंचित असल्याबाबत

**(३६) ५३१२६ (२९-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागामार्फत शेती यांत्रिकीकरणासह विविध योजनांद्वारे प्रामुख्याने ट्रॅक्टर खरेदी, शेती अवजार खरेदी, ठिबक सिंचन खरेदी, औषधे, बी-बियाणे, पाईपलाईन इत्यादी सारख्या योजना अनुदान देण्यात येत असून अनुदानाची तालुका स्तरावर विभागणी करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी हजारो शेतकरी अर्ज करीत असून या अर्जाची छाननी करुन सोडत काढून लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वाटप करते, परंतु मर्यादित व तोकडे अनुदान, हजारो मागणी करणारे शेतकरी यामुळे असंख्य शेतकऱ्यांना अनुदान सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या कृषी विभागाची शेती यांत्रिकीकरण योजना देखील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाची योजना असून याकरिता कृषी अनुदान वाढ करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) कृषि विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी हजारो शेतकरी अर्ज करीत असून या अर्जाची छाननी करुन सोडत काढून लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वाटप केले जात आहे. कृषि विभागाच्या अन्य योजनांप्रमाणे शेती यांत्रिकीकरण योजना देखील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्तवाची असून सदर योजनेकरिता चालू आर्थिक वर्षामध्ये अनुदानात वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भुमी अभिलेख विभागाअंतर्गत जमीनींची मोजणीची लाखो प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत.**

**(३७) ५३३५२ (२९-०१-२०२३). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भुमी अभिलेख विभागाअंतर्गत भु-करमापकाची (सर्वेअर) पदे रिक्त असल्यामुळे नियमित जमीन मोजणीची लाखो प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भुमि अभिलेख विभागात रिक्त पदांमुळे मोजणीची फी भरुन जमीन मोजणीकरिता ६ ते ८ महिने वाट पहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील भुकरमापक (सर्वेअर) पदे भरण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,असल्यास त्यानुसार किती रिक्त पदे भरण्यात आहेत तसेच जमीनींची मोजणी करण्याकरिता पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०३-२०२३) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ भूकरमापक तथा कनिष्ठ लिपीक संवर्गातील १२६८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता, उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा, दि.२८.११.२०२२ ते दि.३०.११.२०२२ या कालावधीत IBPS कंपनीमार्फत घेण्यात आलेली आहे. त्यानुसार, सर्वसाधारण गुणवत्तायादी प्रसिध्द करणेत आली असून १२६८ उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्याचे काम प्रगतीत आहे.

राज्यात माहे ऑक्टोंबर, २०२२ अखेरच्या सर्व प्रकारच्या एकूण प्रलंबित ९६,३३९ मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी, भूकरमापकास मदतनिस म्हणून नेमणूक करण्याबाबत संबंधित उपसंचालक भूमि अभिलेख व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत व भूकरमापक मदतनिससाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच सप्टेंबर, २०२२ अखेरची ४८०२७ प्रलंबित मोजणी प्रकरणे मार्च, २०२३ पर्यंत निपटारा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

---

वि.स. १५१ (२४)

## दौलत शेतकरी साखर कारखाना लि. हलकर्णी या कारखान्याची गाळप झालेल्या ऊसाची बाकी असलेली वाजवी आणि लाभदायक किंमत देण्याबाबत

**(३८) ५३३९२ (२७-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौलत शेतकरी साखर कारखाना लि.हलकर्णी या कारखान्याची सन २०१०-११ या कालावधीत गाळप झालेल्या ऊसाची वाजवी आणि लाभदायक किंमत (एफ.आर.पी.) देणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा कारखाना कोल्हापूर मध्यवर्ती सहकारी बँकेने SARFAESI ACT च्या माध्यमातून ताबा घेऊन Leave & amp; Licence बेसीसवर (भाडेतत्वावर) सदर कारखाना मे.अथर्व इंट्राटेड प्रा.लि. १६२ कोटीची देणी स्वीकारुन ३९ वर्षासाठी चालवायला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भाडे करारामध्ये शेतकऱ्यांची वाजवी आणि लाभदायक किंमत (एफ.आर.पी.) देणी २४ कोटी १५ लाख देय आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात कारखाना गेली तीन वर्ष अथर्व इंट्राटेड प्रा.लि. चालवत असून वाजवी आणि लाभदायक किंमत (एफ.आर.पी.) देणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१०-०३-२०२३) :** (१) गाळप हंगाम २०१०-११ ची दौलत शेतकरी साखर कारखाना लि, हलकर्णी या कारखान्याची रुपये ३६२२.६६ लाख थकीत देय एफआरपी च्या वसूलीसाठी ऊस नियंत्रण (आदेश) १९६६ मधील तरतुदीनुसार पारित दिनांक २८/०५/२०११ च्या आरआरसी आदेशाची अंमलबजावणी करुन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या दि. १३/०६/२०११ च्या आदेशानुसार तहसीलदार चंदगड यांनी दि. १४/०६/२०२१ रोजी कारखान्याकडील २,१७,९८४ क्विंटल साखर साठा जप्त करुन लिलाव पध्दतीने विक्री केला. यातून प्राप्त रुपये ५२९५.३६ लाख रक्कमेतून आरआरसी झालेल्या थकीत एफआरपी पैकी रुपये १८११.३३ लाख एफआरपी रक्कम अदा केली असून उर्वरीत रुपये १८११.३३ लाख व त्यावरील १५ टक्क्यांनी होणारे विलंब कालावधीतील व्याज देय बाकी आहे.

(२) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदर साखर कारखाना सरफेसी कायदयाअंतर्गत दि.१/०७/२०११ मध्ये जप्त करुन कारखान्याचा प्रत्यक्ष ताबा दि. २५/०९/२०१२ रोजी घेतला आहे. तसेच सदर कारखाना बँकेने मे. अथर्व इंटरट्रेड प्रा.लि. या कंपनीस दि. ३०/०३/२०१९ रोजी भाडेतत्वावर ३९ वर्षाच्या भाडेकराराने दिला आहे.

(३) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, कोल्हापूर व अथर्व इंटरट्रेड प्रा.लि. यांच्यामध्ये दिनांक ३० मार्च २०१९ रोजी झालेल्या भाडेकरारानुसार दिनांक ३१/०३/२०१६ अखेरचे कारखान्याच्या ताळेबंदानुसार रुपये १६२,४७,२८,०००.०० एवढया रक्कमेची देयता (Liabilities) स्वीकारलेली आहे. सदर देयतेमध्ये रु.२४ कोटी १५ लाख देय एफआरपी रक्कमेचा समावेश आहे.

(४) व (५) गाळप हंगाम २०१०-११ मधील थकीत एफआरपी बाबत दि. २८/०५/२०११ रोजीच्या आरआरसी आदेशानुसार तहसिलदार, चंदगड यांनी साखर विक्रीतून प्राप्त रक्कमेबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन नं.४५३९/२०११ व ४५३३/२०११ मधील मा.उच्च न्यायालयाकडील दिनांक २६/०६/२०११ रोजीच्या आदेशानुसार रुपये २७,९४,२७,९१०/- मा. उच्च न्यायालयात जमा केले असल्याने व सदरची बाब न्याय प्रविष्ठ असल्याने गाळप हंगाम २०१०-११ मधील सदर थकीत एफआरपीची रक्कम मे. अथर्व इंटरट्रेड प्रा.लि. कंपनीने अदयापपर्यंत दिलेली नव्हती. मा. उच्च न्यायालयाकडील दिनांक ११ जुलै २०२२ रोजी आदेशान्वये सदरची

मा. उच्च न्यायालयात जमा रक्कम गाळप हंगाम २०१०-११ थकीत एफआरपी रक्कम अदा करणेसाठी वापरता येणार नाही, हे स्पष्ट झाल्याने सदरची थकीत एफआरपी रक्कम मे. अथर्व इंटरट्रेड प्रा.लि. कंपनीने अदा करणेबाबत कंपनीस वेळोवेळी सुचित केले आहे.

---

**शासनाच्या मच्छीमार विरोधी धोरणामुळे पर्ससीन पद्धतीने मासेमारी करणा-या लाखो मच्छिमार बांधवांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली असल्याबाबत**

**(३९) ५३४३० (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या मच्छीमार विरोधी धोरणामुळे पर्ससीन पद्धतीने मासेमारी करणा-या लाखो मच्छिमार बांधवांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातत्याने होणारी डिझेल दरवाढ, वाढती महागाई, तसेच डिझेल परताव्याची कोटयवधी रूपयाची रक्कम अद्यापपर्यंत न मिळाल्यामुळे मच्छिमार बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाचा मच्छिमार विरोधी निर्णय मागे घेण्यासाठी तसेच डिझेल परताव्याची कोटयावधी रूपयाची थकीत रक्कम तातडीने मिळण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

मासेमारी व्यवसायातील विविध घटकांचे विशेषत: पारंपारिक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासणे व मासेमारी प्रयत्नांचे व्यवस्थापनाव्दारे मत्स्यसाठयाचे जतन करून, कमाल शाश्वत मत्स्योत्पादन राखण्यासाठी राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारीचे नियमनाबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती करण्यासाठी मंजूर रू.१६३.०० कोटी इतक्या निधीपैकी रू.१११.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला असून निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित निधी वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर पशुसंवर्धन विभागातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(४०) ५३४४४ (२९-०१-२०२३). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील व शहरातील उत्तर सोलापूर तालुक्यात गाय, म्हैस, शेळ, मेंढी या वर्गातील ५६ हजार पशुसंवर्धन आरोग्याची देखभाल करण्यासाठी सुमारे ३० अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असताना अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उक्त तालुक्यातील रिक्त पदांची संख्या पाहता अक्कलकोट तालुक्यात अनेक पदे रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गट-अ अधिकाऱ्याची नेमणूक शासनामार्फत केली जाते त्या नेमणूका करण्यात आल्या काय तसेच उक्त रिक्त पदे तात्काळ भरून पशुपालकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०३-२०२३) :** (१) २० व्या पशुगणनेनुसार सोलापुर जिल्ह्यामध्ये गायवर्ग-७,४५,४०४; म्हैसवर्ग-४,९६,४५४; शेळया- ९,६२,५०४ व मेंढ्या-१,२५,३८६ याप्रमाणे पशुधन असून, उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये गायवर्ग-१३,५८१; म्हैसवर्ग-१८,१८९; शेळया-२२,५१० व मेंढ्या-१,८९६ याप्रमाणे पशुधन उपलब्ध आहे. उत्तर सोलापूर तालुक्यामधील पशुवैद्यकीय संस्था/दवाखान्यांमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांची एकूण १९ पदे मंजूर असून, सद्यस्थितीत यापैकी १३ पदे भरलेली असून, ६ पदे रिक्त आहेत.

(२) अक्कलक्कोट तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाच्या पशुवैद्यकीय संस्था/दवाखान्यांमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांची एकूण २१ पदे मंजूर असून, सद्यस्थितीत यापैकी १६ पदे भरलेली असून, ५ पदे रिक्त आहेत.
(३) व (४) पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या अधिकारी/ कर्मचारी यांचेकडे सोपवून पशुपालक व शेतकऱ्यांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासंदर्भात चाळणी परिक्षा पार पडली आहे, आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून शासनास शिफारस प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

---

**राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालक पदाची**
**वयोमर्यादा ५० वरुन ५५ वर्षे करण्याबाबत**

**(४१) ५३५७६ (२४-०१-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालक पदाची पात्रता यादी निकष नियमावलीमध्ये कमाल वयोमर्यादेता असलेली वयाची अट ५० वरुन ५५ वर्षे करावी, अशी मागणी साखर उद्योगात कार्यरत अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघामार्फत सहकार व वस्त्रोद्योग विभागाच्या विभागाकडे केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संघाने संचालक मंडळाच्या दिनांक १० मे, २०२२ रोजीच्या सभेमध्ये सविस्तर चर्चा करुन कार्यकारी संचालकांच्या पॅनेलची कमाल वयोमर्याचा ५० वर्षे ऐवजी ५५ वर्षे करण्याचा ठराव मंजूर करुन तो राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोउद्योग विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किती साखर कारखान्यात ५० वर्षे पूर्ण केलेले कार्यकारी संचालक अद्यापपर्यंत कार्यरत असून शासनाकडून त्यांना हंगामी मुदतवाढ देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात कार्यकारी संचालक पदाची वयोमर्यादा ५० वरुन ५५ वर्षे करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०३-२०२३) :**(१) व (२) होय.
(३) सहकारी साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे असल्यामुळे हंगामी मुदत वाढ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन शुद्धीपत्रक दि.१५/०६/२०२२ अन्वये राज्यातील साखर कारखान्याच्या नवीन पॅनेल वरील कार्यकारी संचालक पदाची नियुक्तीची कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामी, निमगुळ, टाकरखेडा, तावखेडा, वडदे, चवळदे व कुरूकवाडे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या गावांना**
**गटस्किम अभावी शेतजमिन मोजणीपासून वंचित असल्याबाबत**

**(४२) ५४१२० (२९-०१-२०२३). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामी, निमगुळ, टाकरखेडा, तावखेडा, वडदे, चवळदे व कुरूकवाडे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या गावांना गेल्या ६० वर्षापासुन गट स्किम लागू नसल्याने शेतजमिन मोजणीपासून अनेक शासकीय कामांना अडथळे निर्माण होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जमावबंदी आयुक्त पूणे यांच्याकडे पत्रव्यवहार करूनही अदयाप त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने उक्त गावांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) उक्त ७ गावांना एकत्रिकरण योजना लागू आहे. मात्र एकत्रिकरण योजनेप्रमाणे गाव नमुना नं. ७/१२ चे प्रख्यापन होवून एकत्रीकरण योजनेतील गट नंबर नुसार ७/१२ स अंमल झालेला नसल्याने गटाचे ७/१२ उपलब्ध नाहीत.
उपरोक्त गावांच्या मंजूर योजनेप्रमाणे प्रख्यापन होवून महसूल अभिलेखास गाव दप्तरी अंमल झालेला नसल्याने जमीनीचे अधिकार अभिलेख ( ७/१२ ) मंजूर गट स्किमनुसार नसून मुळ सर्व्हे नंबरनुसार आहेत. मात्र ७/१२ वर सर्व्हे नंबर (भूमापन क्रमांक) ऐवजी गट नंबर असे नमूद आहे. माहे नोव्हेंबर २०२२ पुर्वी वरील गावांमधील जमिनीची मोजणी एकत्रीकरण योजनेपूर्वीच्या मुळ सर्व्हे नंबरच्या अभिलेखाच्या आधारे केली जात होती. तथापी सदरच्या गावांना एकत्रिकरण योजना मंजूर असताना मोजणी अर्जासोबत सादर केलेले ७/१२ उतारे हे मंजूर एकत्रिकरण योजनेचे गट नंबर प्रमाणे नसल्याने, मंजूर योजनेप्रमाणे गट नंबरचे ७/१२ उतारे मोजणी अर्जासोबत सादर करणेकामी उप अधीक्षक भूमि अभिलेख सिंदखेडा यांनी संबंधित अर्जदार यांना कळविले आहे. त्यामुळे माहे नोव्हेंबर २०२२ पासून उक्त गावांमध्ये मोजणीचे काम बंद करण्यात आलेले होते.
सद्यस्थितीत एकत्रिकरण योजनेचा अंमल अद्याप झालेला नसल्याने उक्त नमूद गावांमधील जमीनीबाबत प्राप्त होणाऱ्या मोजणी अर्जाकामी उपलब्ध असणाऱ्या ७/१२ अभिलेखानुसार मोजणीची कार्यवाही चालू करणेबाबत सुचना देणेत आलेल्या आहेत. प्राप्त मोजणी अर्जांचे अनुषंगाने मोजणी तारखा नेमण्यात आलेल्या आहेत.

---

## माहूल गाव (चेंबूर) येथील खाडी व कांदळवनात होणारी अनधिकृत भरणी व बांधकामाबाबत

**(४३) ५४९४६ (२९-०१-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूल गाव (चेंबूर) येथील विधानसभा क्षेत्रातील खाडी व कांदळवनात काही समाजकंटक रात्री-अपरात्री मोडतोड व त्याची भरणी करुन त्यावर अनधिकृत बांधकामे करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनधिकृत भरणीबाबत मुंबई महानगरपालिका, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, राष्ट्रीय केमिकल्स एवं फर्टिलाइजर्स लिमिटेड (आर.सी.एफ.) पोलिस ठाणे व मिठागरे या विभागांना माहिती असून देखील अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
मौजे माहुल येथील न.भु.क्र. १ पै., सर्व्हे क्र. ७२ पै, मधील ४०.४२ हे. आर अधिसूचित कांदळवन क्षेत्रापैकी ०.०६ हे क्षेत्रावर व अधिसूचित क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्रात अनधिकृत भराव केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) मौजे माहुल येथील न.भु.क्र. १ पै., सर्व्हे क्र. ७२ पै. मध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत भरावाच्या अनुषंगाने रौंड गुन्हा क्र. ई-१/२०२०-२१, दिनांक १५.१.२०२१ अन्वये वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर वन गुन्ह्याच्या चौकशीमध्ये पाच आरोपींना दिनांक १७.२.२०२१ रोजी अटक करुन मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच डंपिंग करण्यासाठी वापर करण्यात आलेले ४ डंपर जप्त करुन ताब्यात घेण्यात आले आहेत. सदर डंपरवरती कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येऊन दंडात्मक रु. १,०४,०००/- वसुल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगांव (जि.नाशिक) येथील मध्यवर्ती प्रशासकीय संकुलात तालुका भुमी अभिलेख कार्यालयाचे स्थलांतरणाबाबत

**(४४) ५४९६३ (२९-०१-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (जि. नाशिक) तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालय एका छताखाल यावे यासाठी उभारण्यात आलेल्या नव्या मध्यवर्ती प्रशासकीय संकुलात महसूल, पंचायत समिती, कृषी, सहकारसह अन्य आस्थापनांचे स्थलांतर झालेले असताना तालुका भूमी अभिलेख कार्यालयाचे नव्या मध्यवर्ती प्रशासकीय संकुलात स्थलांतर करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आंदोलने केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसीलदारांनी उक्त कार्यालयास स्थलांतरीत होण्याबाबत आदेशीत करुनही नव्या मध्यवर्ती प्रशासकीय संकुलात स्थलांतर करण्यास भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदगाव तालुका भूमी अभिलेख कार्यालय नव्या मध्यवर्ती प्रशासकीय संकुलात स्थलांतरीत करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदरचे कार्यालय स्थलांतरासाठी लोकप्रतिनिधींची आंदोलने झालेली नाहीत. मात्र दिनांक २९.०६.२०२१ रोजी मा.विधानसभा सदस्य यांचे समवेतच्या शिष्टमंडळासोबतच्या चर्चेदरम्यान सर्वसामान्य जनतेस शासकीय कामकाजाच्या समस्या एकाच प्रांगणात सोयीचे व्हावेत यासाठी कामकाजाचा निपटारा प्रभावीपणे व्हावे, यादृष्टीने उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय हे तहसिल कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतरीत करणेबाबत मा. विधानसभा सदस्यांनी समक्ष सुचित केले आहे.
(३) हे खरे नाही.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, नांदगाव कार्यालय नविन प्रशासकीय इमारतीमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यांचे जागा वाटप आदेश प्राप्त झाले नसल्यामुळे स्थलांतरीत झाले नाही.

आता, तहसिलदार, नांदगाव यांचे दिनांक १५.०२.२०२३ रोजीच्या पत्रानुसार उपविभागीय अभियंता नांदगाव यांनी दिनांक १५.०२.२०२३ चे पत्रान्वये प्रशासकीय इमारतीमध्ये ३ खोल्या या कार्यालयासाठी आरक्षित केल्याबाबत उप अधीक्षक भूमि अभिलेख नांदगाव यांना कळविले आहे. त्यानुसार कार्यालय स्थलांतर करण्याची कार्यपद्धती करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील खारपाणपट्टा क्षेत्र विकास योजनेच्या प्रस्तावाच्या प्रारुप आराखड्याला मान्यता मिळण्याबाबत

**(४५) ५५४२४ (२९-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील १६ तालुक्यांचा समावेश असलेल्या अमरावती येथील पूर्णा नदीच्या दोन्ही काठावरील खारपाणपट्टा क्षेत्रातील शेतकऱ्यांचा विकास होण्याकरिता विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रस्तावाच्या प्रारुप आराखड्याला मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक शेतकऱ्यांचा विकास होण्याकरिता प्रारुप आराखड्याला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तत्कालीन मा. मंत्री, श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ३९ सदस्यीय समितीच्या अहवालात नमूद अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्हयातील ८९४ गावांचा समावेश जागतिक बँकेच्या सहाय्याने कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात करण्यात आलेला आहे. या प्रकल्पातंर्गत वैयक्तिक लाभाचे घटक, मृद संधारणाची कामे तसेच शेतकरी उत्पादक कंपनी / गट यांचे कृषि व्यवसाय प्रकल्प उभारणीकरिता अर्थसहाय्य डीबीटी द्वारे देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## भुसावळ, (जि. जळगांव) येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय निरिक्षक यांची चौकशी करण्याची मागणी केल्याबाबत

**(४६) ५५५६५ (२९-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय निरिक्षक श्री. सुजित कपाटे, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, भुसावळ, यांची चौकशी करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान संबधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२८-०२-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

"राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय निरिक्षक श्री.सुजित कपाटे, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, भुसावळ, (जि.जळगाव) यांची चौकशी होणेबाबत" अशा आशयाचे मा.श्री.चंद्रकांत पाटील, विधानसभा सदस्य यांचे दिनांक १२.०१.२०२२ रोजीचे निवेदन या विभागास प्राप्त झाले आहे.

(२) मा.श्री.चंद्रकांत पाटील, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक.१२.०१.२०२२ रोजीच्या निवेदनात "मुक्ताईनगर कार्यालय, भुसावळ येथे दाखल गुन्हा ११/२०२२ बद्दल समिती नेमून चौकशी करण्याची तसेच श्री.कपाटे यांचीही चौकशी करण्याची विनंती केली होती. त्यानुषंगाने, विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांनी अधीक्षक, राउशु, नंदूरबार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य चौकशी समिती नेमली होती. सदर समितीच्या अहवालानुसार श्री.कपाटे, निरीक्षक, राउशु, भुसावळ यांनी भुसावळ येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये दाखल केलेल्या गुन्हा क्र.११/२०२२ मध्ये आरोपींवर कायदेशीर कारवाई केली आहे.
(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

**सातारा जिल्हयात प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखान कबरीजवळील बेकायदा बांधकामाबाबत**

**(४७) ५५६०६ (२९-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयात असलेल्या प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखान कबरीच्या भोवती करण्यात आलेले नव्याने बांधकाम, राहण्यासाठी उभारण्यात आलेल्या खोल्या हे अवैध बांधकाम माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान हटविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वाढीव बांधकाम कोणी केले याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०३-२०२३) :** (१),(२) व (३) प्रतापगड मौजे रानअडवागौंड ता.महाबळेश्वर जि.सातारा येथील अफजलखानाच्या कबरी भोवतीच्या वन जमीनीवरील व शासकीय जमीनीवरील अनधिकृत बांधकाम मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. १४२/२००४, जनहित याचिका क्र. १४१/२००७ व अवमान याचिका क्र. २६७/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालयामध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनामार्फत दिनांक १०/११/२०२२ रोजी हटविण्यात आले आहे.

सदरचे अनधिकृत बांधकाम हजरत महंमद अफजलखान मेमोरिएल सोसायटी यांनी केले असून वाढीव बांधकामाबाबत त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केली आहे. सदर याचिका न्यायाप्रविष्ठ आहे. तसेच जिल्हा प्रशासनामार्फत अनधिकृत बांधकाम काढण्याच्या मुद्याबाबत हजरत महंमद अफजलखान मेमोरिएल सोसायटी यांनी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केला आहे.

---

**राज्यातील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची २५०० पदे रिक्त असल्याबाबत**

**(४८) ५५७७८ (२९-०१-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची २५०० पदे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील पाळीव प्राण्यांना पुरेशा वैद्यकीय सुविधा मिळत नसल्याबाबत माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजुर रिक्त पदांची पदभरती प्रलंबित असल्याने कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर त्यांच्या कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे तसेच पाळीव प्राण्यांना वेळेवर योग्य उपचाराअभावी आपला प्राण गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १५१ (३१)

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०३-२०२३) :** (१) व (२)

राज्यातील पशुसंवर्धन विभागांतर्गत मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट-अ | २६४४ | २१०६ | ५३८ |
| गट-ब | ४१९ | ५४ | ३६५ |
| गट-क | १८९५ | ७३५ | ११६० |
| गट-ड | १९०५ | ६९२ | १२१३ |
| एकूण | ६८६३ | ३५८७ | ३२७६ |

पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या अधिकारी/ कर्मचारी यांचेकडे सोपवून पशुपालकांना व शेतकऱ्यांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुसंवर्धन विभागातील सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत चाळणी परिक्षा पार पडली आहे, तसेच कनिष्ठ लिपिक (गट-क) संवर्गाची ३९ रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे पशुसंवर्धन आयुक्तालयांतर्गत पशुधन पर्यवेक्षक (गट-क) संवर्गाची ३७६ पदे व वरिष्ठ लिपिक (गट-क) संवर्गाची ४४ पदे भरण्यास्तव IBPS कंपनीची निवड करण्यात आली असून, पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे-कशेळी (ता. भिवंडी) येथील कणेरी गाव, दापोडे गावातील झालेल्या साठेकरारांच्या मुद्रांक शुल्क अभिनिर्णय व कमी भरलेले मुद्रांक शुल्क अर्जदार व इतर लोकांनी न भरल्याबाबत

**(४९) ५५९३५ (२९-०१-२०२३). श्री.कैलास गोरंट्याल (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-कशेळी (ता. भिवंडी) येथील गाव, कणेरी गाव, दापोडे गावातील झालेल्या साठेकरारांच्या मुद्रांक शुल्क अभिनिर्णय व कमी भरलेले मुद्रांक शुल्क अर्जदार व इतर लोकांनी न भरल्याने त्यांच्याकडून थकित महसूलांचे रक्कमेची वसूली करणे जरुरीचे आहे ते वसूल न झाल्याने शासनाचे गतकाळात १६००० कोटीं रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे, ग्रामीण यांनी उक्त वसुली न केल्याने अनेक प्रकरणे गेल्या ७-८ वर्षापासून प्रलंबीत आहेत, मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे, ग्रामीण यांच्याकडे जुने खरेदीखत, साठेकरार, करारनामे, कुलमुखत्यारपत्र, हक्कसोडपत्र, वाटणीपत्र, रद्दकरार, मुद्रांक परतावा आदिचे थकित वसूली न झाल्याने शासनाचे महसूली नुकसान होते हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, संबंधित खातेदारांचे सातबाऱ्यावरील बोजा चढविणे आदि शासनाचे नियमित धोरण असून ठाणे जिल्हा मुद्रांक कार्यालयाकडून यांच्यावर कोणतीच कारवाई होत नसल्याचे निदर्शनास दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास श्री. नागेश निमकर व दिलीप गायकवाड या तक्रारदारांनी नोंदणी महानिरीक्षक- पुणे यांच्याकडे तक्रार दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधीत गावातुन न भरलेले मुद्रांक शुल्क अनेक मिळकतीतुन कमी पडलेले शुल्क जमिन खरेदीखताच्या थकित महसूलांच्या रक्कमेतुन वसूली करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १५१ (३२)

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी मुद्रांक जिल्हाधिकारी,ठाणे ग्रामीण यांचे स्तरावर एकूण ६ प्रकरणांमध्ये एकूण रु.३७१४०/- मुद्रांक शुल्क दंडासह वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मौजा तळेगाव (शा.पं.) (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे सिट्रस इस्टेट या योजनेच्या अंमलबजावणीकरिता विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करुन कामास सुरुवात करण्याबाबत**

**(५०) ५६४४७ (२९-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा तळेगाव (शा.पं.) (ता.आष्टी, जि.वर्धा) येथे फळरोप वाटीकेच्या जागेवर सिट्रेस इस्टेट स्थापना करण्यास शासनाने दिनांक ७ मार्च, २०१९ च्या परिपत्रकानुसार मान्यता मिळाल्यानुसार दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास तीन कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना राबविण्याकरिता कंपनी कायदा, २०१३ व सहकारी संस्था अधिनियम अतंर्गत नोंदणी करण्यात आली नसून सिट्रेस इस्टेट मध्ये अजूनपर्यंत कोणत्याही समित्यांची स्थापना करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष उपलब्ध नसल्यामुळे लागणाऱ्या मनुष्यबळास मान्यता देण्यात आली असून कार्यवाही करण्यात आली नाही व सिट्रेस इस्टेटच्या प्रशासकीय बाबी पूर्ण करण्यात आल्या नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर व अमरावती जिल्ह्यातील सिट्रेस सेंटर सुरु करण्यात आले असून शासन वर्धा जिल्ह्यातील तळेगाव (शा.पं.) येथील सिट्रेस सेंटर सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनीधी यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी विदर्भातील संत्रा व मोसंबी या पिकाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये निराशा पसरलेली असल्यामुळे या सर्व बाबींना विलंब करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

मौजा तळेगाव (ता. आष्टी, जि. वर्धा) येथील सिट्रस इस्टेटची संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणी करण्यात आली आहे. तसेच सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या रोपवाटिकेचे संरचनात्मक लेखापरिक्षण, शेतकऱ्यांचे प्रशिक्षण त्याचबरोबर राष्ट्रीय लिंबू वर्गीय संशोधन केंद्र, नागपूर येथून संत्रा या फळपिकाची रंगपूर, जंबेरी यांची अनुक्रमे १०० व ५० रुट स्टॉक, लिंबू या फळपिकाचे प्रणालीनी (५ कलमे), साई सरबत्ती (१० कलमे), एन.आर.सी.सी.-८ (१० कलमे), फुले सरस्वती (५ कलमे) सिट्रस इस्टेटच्या प्रक्षेत्रावर आणण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी अध्यक्ष, सिट्रस इस्टेट, तळेगाव (शा.प.) ता. आष्टी तथा तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, सिट्रस इस्टेट यांनी जैन इरिगेशन, जळगांव येथे हायटेक नर्सरीला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कार्यप्रणाली जमजून घेतली आहे.
(४) नागपूर व अमरावती जिल्ह्यातील सिट्रस इस्टेट सुरु करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच वर्धा जिल्ह्यातील तळेगाव (शा.प.) येथील सिट्रस सेंटर सुरु करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारा पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.